महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

फोन : २४०७७४४१
ग्राम : पर्सनग्रीड, मुंबई.
फॅक्स : २४०२५७६३

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं. १, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
साप्रवि / मावक / जाती प्र.

**प्रशासकीय परिपत्रक ११४ दिनांक ०६/०७/२००७.**

**विषय :** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर पदोन्नती देण्यापूर्वी तसेच सरळ सेवा भरती करतांना उमेदवारांच्या जाती प्रमाण पत्राची / जातीच्या दाखल्याची वैधता तपासणी बंधनकारक करणेबाबत.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. सीबीसी - १२- २००० /२५२ / प्र.क्र. १ इमाव - ५, दि.२५.१.२०००.
२) शासन निर्णय क्र. सीबीसी - १० / २००३ / प्र. क्र. ९१ / मावक -५, दि. ८.१२.२००३.
३) शासन परिपत्रक क्र. सीबीसी -१० /२००४ प्र.क्र. ५७० /मावक -५, दि. ५.०३.२००५.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. ७७ दि. २१/०९/२००६.
५) शासन निर्णय क्र. सीबीसी - १०/ २००४/ प्र.क्र.५७० /मावक- ५ , दि.१६.०५.२००७

उपरोक्त विषयाबाबतचे मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वर नमुद केलेले १ ते ३ शासन निर्णय / शासन परिपत्रक, प्रशासकीय परिपत्रक क्र. ७७ , दि. २१.९.२००६. अन्वये यापूर्वीच अंमलबजावणीसाठी जारी केलेले आहेत.

२. आता, मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी जाती प्रमाण प्रत्रांची / जाती दाव्याची वैधता तपासणी संदर्भात शासन निर्णय क्र. बीसीसी - १० / २००४ / प्र.क्र. ५७० / मावक - ५, दि. १६.५.२००७ अन्वये स्पष्टीकरण दिले असून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

३. प्रशासकीय परिपत्रक क्र. ७७, दि. २१.९.२००६ मधील इतर सूचना अबाधित राहतील.

४. उपरोक्त शासन निर्णय मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, यांनी संचालक (संचलन) व संचालक ( वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन स्विकृत केले आहे.

५. वरील प्रशासकीय परिपत्रकास सर्व स्तरावर प्रसिध्दी द्यावी तसेच सर्व नियुक्ती अधिका-यांनी सदर प्रशासकीय परिपत्रक त्यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावावे.

सोबत : दि. १६.५.२००७ चा शासन निर्णय.

मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.)

प्रति,
म,रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
कार्यकारी अभियंता यांचे स्तरापर्यंत प्रेषण यादीनुसार.

अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थामध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००४/प्रक्र-५७०/मावक-५

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२**

दिनांक : १६ मे, २००७

<u>वाचा :-</u> (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८-ईएसटीटी(आरइएस),दि.१६ मार्च, १९९९

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी१२/२००२/२५२/प्र.क्र.१/ इमाव-५ दि.२५ जानेवारी,२०००

(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५ दि.८ डिसेंबर,२००३

(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/इमाव-५, दि.२८ जानेवारी,२००४ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक ६ फेब्रुवारी,२००४

**प्रस्तावना :** संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक २८.१.२००४ चा शासन निर्णय व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक ६.२.२००४ अन्वये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित विभागांनी करुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे त्वरित सादर करावीत व समितीने आपला निर्णय ३ महिन्याचे आंत संबंधीत विभागाकडे सादर करावा असे शासनाचे आदेश आहेत त्यामध्ये सुधारणा करुन दि.५ मार्च,२००५ च्या परिपत्रकान्वये अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे जाती दाव्याची वैधता तपासणी अद्यापही झालेली नाही. त्यापैकी जे पदोन्नतीच्या क्षेत्रात येतात (zone of consideration) त्यांचा जाती दावा पदोन्नतीच्या प्रक्रीयेपूर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागांनी जातीप्रमाणपत्रे विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावीत व त्यानंतर संबंधीतांना पदोन्नती द्यावी. मागासवर्गीय उमेदवाराच्या जाती

याबा पडताळणीबाबत दि.२५ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार स्वयंस्पष्ट आदेश आहेत. तरीही याबाबत वारंवार मार्गदर्शनार्थ संदर्भ प्राप्त होतात. याबाबत स्पष्टीकरण करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

१) खुल्या प्रवर्गातून शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्यांच्या नियुक्तीनंतर कालांतराने मागासवर्गीय आरक्षणाचे फायदे मिळविण्यासाठी जर जाती प्रमाणपत्रासह अर्ज केला असेल तर त्या उमेदवाराने ज्या तारखेला जातीचे प्रमाणपत्र कार्यालयाकडे सादर केले आहे त्या तारखेपासून पुढे आरक्षणाचे फायदे जातीच्या दाव्याची वैधता तपासून झाल्यावर देय ठरतील. ( भूतलक्षी प्रभावाने लाभ देय ठरणार नाही. )

२) इतर मागासप्रवर्गाला पदोन्नतीमध्ये आरक्षण नसल्याने इतर मागासवर्ग प्रवर्गातून यापूर्वीच शासन सेवेत प्रविष्ट झालेल्या व अद्यापही वैधता तपासणी न झालेले महाराष्ट्र राज्यातील मूळ निवासी असलेल्या उमेदवाराची पदोन्नतीसाठी वैधता तपासणीची आवश्यकता नाही. तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले नाही. तथापि, सरळसेवेने नियुक्तीनंतर जाती वैधता तपासणी करणे सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता बंधनकारक आहे.

३) एखाद्या जातीचा प्रवर्ग शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार बदलण्यात आला असेल व त्या जातीचे प्रमाणपत्र/वैधता तपासणी त्या जातीच्या उमेदवाराकडे असेल तर सदर उमेदवारास पुन्हा सर्व कागदपत्र देऊन नव्याने जातीचे प्रमाणपत्र काढण्याची आवश्यकता नसून जुने जातीच्या प्रमाणपत्र, उप जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करुन शासनाच्या, शासन निर्णयानुसार त्यांना नविन प्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र त्वरीत देण्यात यावे व जुन्या जातीच्या प्रमाणपत्राची वैधता तपासणी झाली असल्यास पुन्हा नविन जातीच्या प्रमाणपत्राची वैधता तपासणी करणे आवश्यक नाही.

४) जर एखादा मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गातून सेवेत आला असेल व त्याने कधीही, कुठल्याही स्तरावर, कुठल्याही प्रकारचे मागासवर्गीय आरक्षणाचे फायदे घेतले नसतील. असा उमेदवार आरक्षणाच्या लाभाकरिता मागणी करत नसेल तर अशा उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्याची आवश्यकता नाही. मात्र आरक्षणाच्या लाभाची मागणी करणाऱ्या उमेदवाराचा जाती दावा तपासणे आवश्यक राहील.

हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक 200705171130453001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

१६/५/२००७

( रमेश म.उबाळे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विजाभज) यांचे खाजगी सचिव,
सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
प्रबंधक,उच्च न्यायालय (अपील शाखा/मूळशाखा), मुंबई
प्रबंधक,मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
सचिव,गृह मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली
सर्व मंत्रालयीन विभाग,

**त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.**

संचालक,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
संचालक,नगरपालिका प्रशासन,मुंबई
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक,आरोग्य सेवा,मुंबई
आयुक्त, अनुसूचीत जाती/जमाती, भारत सरकार, ५वा मजला, लोकनायक भवन, नवी दिल्ली
उप संचालक,अनुसूचीत जाती/जमाती आयोग,भारत सरकार, चिपळूणकर भवन,शास्त्री मार्ग,